**जलयुक्त शिवार अभियान या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी बरोबरच कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कामांची गुणवत्ता राखली जाणे व अंमलबजावणी पारदर्शक पद्धतीने करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**जलसंधारण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः जलशि-२०१५/प्र.क्र.११५/जल-७**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: १३ मार्च, २०१५

प्रस्तावना

सर्वांसाठी पाणी-२०१९ पर्यंत टंचाईमुक्त महाराष्ट्र करण्यासाठी व टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी राज्यात हाती घेण्यात आलेल्या उपाय योजनांची एक बाब म्हणून एकात्मिक पध्दतीने नियोजनबद्धरित्या कृती आराखडा तयार करुन पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी राज्यात **"जलयुक्त शिवार अभियान"** ही योजना राबविण्याबाबत शासन निर्णय दि. ५ डिसेंबर, २०१४ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. सदरहू **"जलयुक्त शिवार अभियान"** या योजनेची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली **"शक्ती प्रदत्त समिती"** गठीत करण्यात आलेली आहे. या अभियानाच्या विभागीय कार्यशाळांपैकी पहिल्या आयोजित करण्यात आलेल्या नागपूर विभागाच्या कार्यशाळेस मा. मुख्यमंत्री महादेय स्वत: उपस्थित राहून त्यांनी उपस्थितांना संबोधित केलेले होते. त्यानंतर सर्व संबंधित मंत्रालयीन सचिवांची आढावा बैठक मा. मुख्यमंत्री महोदयांनी दि. १६ जानेवारी, २०१५ रोजी घेतली. तसेच सर्व विभागीय आयुक्त/ सर्व जिल्हाधिकारी/ सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दि. ०४ फेब्रुवारी, २०१५ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली व कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत सखोल आढावा घेण्यात आला. दि. १६ जानेवारी, २०१५ रोजीच्या आढावा बैठकीचे इतिवृत्त सर्व संबंधितांना पाठविण्यात आलेले आहे. जलयुक्त शिवार अभियान हा कार्यक्रम मा. मुख्यमंत्री महोदयांनी सर्वोच्च प्राधान्याच्या कार्यक्रमांपैकी एक असून सदर कार्यक्रम हा शासनाचा Flagship कार्यक्रम असल्याचे त्यांनी वेळोवेळी जाहिर केले आहे. हे विचारात घेता **या कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणी बरोबरच कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कामांची अत्यंत चांगली गुणवत्ता राखली जाणे अत्यंत आवश्यक असून कामांची अंमलबजावणी पारदर्शक पद्धतीने होण्याची देखील नितांत गरज आहे.** जलयुक्त शिवार अभियान कार्यक्रमाच्या गुणवत्तापूर्वक व पारदर्शी पद्धतीने अंमलबजावणी होण्यासंदर्भात खालीलप्रमाणे मुद्यांवर काटेकोरपणे कार्यवाही करण्याचे निदेश सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात येत आहेत.

१. **समवर्ती मूल्यमापन :-** याबाबत काम सुरु असताना कामाचे किमान २ वेळा समवर्ती मूल्यमापन रोजगार हमी योजना विभागाच्या कामांचे ज्या पद्धतीने Quality Control Monitor यांचे मार्फत करण्यात येते, त्याप्रमाणे समवर्ती मूल्यमापन करण्यात यावे.

२. **त्रयस्त संस्थेमार्फत मुल्यमापन :-** कामे पूर्ण झाल्यानंतर कामांचे त्रयस्त यंत्रणेमार्फत/ संस्थेमार्फत (जसे एकात्मिक पाण्लोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या MELD नुसार ) मूल्यमापन करण्यात यावे.

३. **डिजिटल फोटो :-** काम सुरु होण्यापूर्वी , काम सुरु असताना व काम पूर्ण झाल्यानंतर त्याचे डिजिटल फोटो (GPS Tagged) काढून ज्यामध्ये कामाच्या स्थळाचा अंक्षांश/ रेखांक्ष नमूद असेल असे फोटो काढून ते जनतेच्या माहितीसाठी संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात यावेत.

४. **ग्राम सभेची मान्यता :-** गावाचा पाण्याचा ताळेबंद तयार केल्यानंतर गावातील लोकांनी सूचविल्यानुसारउपचारांचा/ कामांचा अंतर्भाव गावाच्या कृती आराखडयात करुन त्यास ग्राम सभेची मान्यता घेण्यात यावी.

५. **ग्रामपंचायतींना माहिती देणे :-** कृती आराखडयानुसार निश्चित करण्यात आलेली कामे प्रत्यक्षात सुरु करण्यापूर्वी कामांची माहिती ग्रामपंचायतींना देण्यात यावी.

६. **अंतीम देयक अदा करताना अवलंबवयाची कार्यपद्धती :-** पूर्ण करण्यात आलेल्या कामांचे अंतिम देयक संबंधित यंत्रणा (Agency) ला अदा करण्यापूर्वी अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेतील अधिकाऱ्यांनी पूर्ण केलेल्या कामाची तपशिलवार माहिती ग्रामसभेस अवगत करणे देखील आवश्यक आहे. असे करत असताना या संदर्भात ग्रामस्थांकडून कोणत्याही स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्यास अंतिम देयक न देता त्याची संपूर्ण शहनिशा करुन आणि कामाची गुणवत्ता तपासून कामाचे अंतिम देयक अदा करण्याची कार्यपद्धती अवलंबण्यात यावी.

७. **ग्रामसभेस अवगत करणे व मान्यता घेणे :-** मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील तरतुदीनुसार गावामध्ये घेण्यात आलेल्या विकास कामांबाबतची माहिती प्रत्येक ६ महिन्यातून एकदा ग्रामसभेस देणे आवश्यक आहे. त्यानुसार जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत गावामध्ये घेण्यात येणाऱ्या कामांबाबत ग्रामसभेस माहिती देण्यात यावी.

८. **कामाची तांत्रिक नियंत्रण :-** एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत प्रकल्प कार्यान्वयन यंत्रणेस संलग्न असलेल्या पाणलोट विकास पथक ज्यामध्ये कंत्राटी पद्धतीवर नियुक्त करण्यात येणाऱ्या तीन कर्मचारी (समूह संघटक सदस्य व कृषी तज्ञ / कनिष्ठ अभियंता) यापैकी कंत्राटी पद्धतीवर किमान एक अभियांत्रिकी पदवीकाधारक (Diploma in Engineering) कर्मचारी रु. २५ लक्षच्या कामाच्या (ज्यामध्ये साखळी सिमेंट नालाबांध, नाल्यातील गाळ काढणे, खोलीकरण करणे, गाव/साठवण तलाव इ. कामे अंतर्भूत) गटावर असणे आवश्यक राहील. समूह संघटक व उपजिविका उपक्रम यापैकी एकाची नियुक्ती तसेच तांत्रिक ज्ञान असलेला कर्मचारी म्हणून कृषि पदविधर / कनिष्ठ अभियंता या संवर्गामधून नियुक्ती केल्यास कामाच्या तांत्रिक तपासणीस उपयुक्त ठरु शकेल. त्यानुसार आवश्यकतेनुसार यापुढे कार्यवाही करण्यात यावी.

जलयुक्त शिवार अभियान कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये ग्रामसभेची भूमिका अनन्य साधारण महत्वाची आहे. ग्रामसभा ही सार्वभौम आहे. जलयुक्त शिवार अभियानाच्या अंमलबजावणीमध्ये लोकांचा सहभाग हा महत्वाचा मुद्दा असून या कार्यक्रमांतर्गत उपचारांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना उपचारा/कामाबाबत ग्रामपंचायतीस माहिती देणे अत्यंत आवश्यक आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०३१३१५१०४७७१२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vinod S Wakhare

Digitally signed by Vinod S Wakhare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8f4277e1c48d95adb75a5d959bbb8f12b61892a0bf91d9d7250d0bfd4f204c77, cn=Vinod S Wakhare
Date: 2015.03.13 18:06:29 +05'30'

**(वि.सि.वखारे)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४. मा.विरोधी पक्षनेता,विधानसभा/विधान परिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५. सर्व सन्माननीय विधानसभा/विधान परिषद व संसद सदस्य,
६. मा.मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,
७. मा.राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,
८. सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
९. अपर मुख्य सचिव (कृषी),कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०.सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव,मंत्रालय, मुंबई
११.अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग (मदत व पुर्नवसन), मंत्रालय, मुंबई,
१२.आयुक्त (कृषि),कृषि आयुक्तालय, पुणे-४११००१.
१३.सर्व विभागीय आयुक्त
१४.संचालक (मृदसंधारण),कृषि आयुक्तालय, पुणे-४११००१.
१५.प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य,पुणे,
१६.मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) , पुणे.

१७.मुख्य अभियंता, विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम, नागपूर.
१८.संचालक,महाराष्ट्र सुदूर सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
१९.संचालक, भूजल व सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
२०. मुख्य कार्यकारी अधिकारी/ अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे
२१. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरिता)
२२. सर्व जिल्हाधिकारी
२३. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी / अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२४. महालेखापाल एक व दोन, महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर (लेखा परिक्षा व लेखा व अनुज्ञेयता)
२५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२६. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
२७. सर्व उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय,
२८. सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
२९. सर्व अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ,
३०. सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी.
३१. सर्व कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण)
३२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,.
३३. सर्व मंत्रालयीन विभाग
३४. सर्व सह सचिव / उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, ग्रा. वि. व ज.सं. विभाग, मंत्रालय, मुंबई.
३५. नियोजन विभाग/ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
३६. जल-७, निवड नस्ती.